जाहिरात

# हर्नियावर शस्त्रक्रिया हा एकमेव उपचार

हर्निया म्हणजे कृत्रिम किंवा नैसर्गिक छिद्रामधून व्हिस्कस (अवयव) किंवा व्हिस्कसचा काही भाग, ज्यावर पिशवीप्रमाणे झाकलेले आवरण असते. हे शरीराच्या एका भागातून दुसऱ्या भागामध्ये प्रवेश करते.

**हर्निया कोणाला होऊ शकतो?**

- हर्निया नवजात बालकांपासून वृद्धांपर्यंत कोणत्याही वयोगटातील व्यक्तीला होऊ शकतो आणि स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांमध्ये अधिक प्रमाणात दिसून येतो.

**हर्निया कोणत्या वेगवेगळ्या ठिकाणी होऊ शकतो?**

- सर्वात सामान्य inguinal भागात (73%) हर्निया होतो. इतर भागातील प्रमाण फेमोरल हर्निया (17%), नाभीसंबंधीचा हर्निया (8.5%), आणि इतर भागात हर्निया होण्याचे प्रमाण 1.5% आहे. आधीच्या शस्त्रक्रियेच्या जखमेवर उद्भवणारा हर्निया हा inguinal उद्भवणाऱ्या हर्नियानंतर दुसरा आहे. एपिगॅस्ट्रिक, डायफ्रामॅटिक, स्पिगेलियन, लंबर, हायटस हर्निया आणि ऑब्च्युरेटर हर्निया हे हर्नियाचे इतर प्रकार आहेत. लेप्रोस्कोपिक शस्त्रक्रियेनंतर ट्रोकार प्लेसमेंटच्या ठिकाणी पोर्ट साइट हर्निया देखील दिसून येतो.

**एखाद्याला हर्निया का होतो?**

- ताण येणे, जड वस्तू उचलणे, जुनाट खोकला, दीर्घकालीन बद्धकोष्ठता, मिएटल स्टेनोसिस किंवा फिमोसिसमुळे लघवीला जाण्यासाठी ताण येणे किंवा मूत्रमार्ग किंवा प्रोस्टेट वाढणे, लठ्ठपणा, गर्भधारणा, धूम्रपान, जलोदर यामुळे हर्निया होऊ शकतो. थोडक्यात ज्यामुळे पोटाचा दाब वाढतो असे घटक हर्नियासाठी कारणीभूत ठरतात.

**हर्नियाची लक्षणे कोणती?**

- उभे राहिल्यावर किंवा खोकताना अधिक चांगली जाणवते अशी सूज, वेदना. झोपल्यावर सूज सहसा नाहीशी होते.

**हर्नियावर उपचार काय आहेत?**

- शस्त्रक्रिया हा एकमेव उपचार आहे. हर्नियासाठी कोणतेही वैद्यकीय उपचार नाहीत. तात्पुरते उपाय, जसे की पोटाचा पट्टा किंवा ट्रस वापरण्याचा सल्ला रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी योग्य होईपर्यंतच दिला जातो. तथापि, या उपायांचा योग्य वापर न केल्यास त्यांच्या शस्त्रक्रियेत गुंतागुंत होऊ शकते.



डॉ. उमेश बोरवणकर

**हर्नियाचे ऑपरेशन का करावे?**

- उद्भवणाऱ्या गुंतागुंतीमुळे हर्निया झाल्यास शस्त्रक्रिया करावीच लागते. हर्निया बाधित भागात तीव्र वेदना, उलट्या, ओटीपोटाचा विस्तार आणि बद्धकोष्ठता, म्हणजे आतड्यांसंबंधी अडथळा असे विकार बळावतात. याहीपेक्षा गुंतागुंत म्हणजे जेथे हर्निया झाला आहे त्या भागात रक्तपुरवठा थांबतो ज्यामुळे गँगरीन होते आणि तातडीची शस्त्रक्रिया करणे गरजेचे होते. ही गुंतागुंत जीवघेणी असू शकते आणि वेळेवर शस्त्रक्रिया करून ती टाळता येते.

**कोणत्या प्रकारच्या शस्त्रक्रिया करता येतात?**

- हर्निया शरीरातील ज्या भागात झाला आहे त्या जागेप्रमाणे शस्त्रक्रिया अवलंबून असतात. परंतु सामान्यतः शस्त्रक्रियेचे दोन मुख्य पर्याय उपलब्ध आहेत. खुली शस्त्रक्रिया किंवा लॅपरोस्कोपिक शस्त्रक्रिया (किमान प्रवेश शस्त्रक्रिया). शस्त्रक्रियेची निवड रुग्णाच्या वयानुसार, सह-विकारांची परिस्थिती आणि रुग्णाची एकूण तंदुरुस्ती यावर अवलंबून असते.

**हर्नियाच्या शस्त्रक्रियेदरम्यान जाळी बसवणे अनिवार्य आहे का?**

- लहान मुलांमध्ये आणि मुलांमध्ये जाळी वापरली जात नाही परंतु इतर वयोगटांमध्ये जाळीचा वापर आता क्रमप्राप्त झाला आहे. Inguinal हर्नियासाठी जाळीशिवाय इतर पध्दतीने शत्रस्क्रिया करून उपचार केले जातात. जाळीच्या वापरामुळे हर्नियाच्या शस्त्रक्रियेनंतर पुनरावृत्ती होण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

**हर्निया शस्त्रक्रियेदरम्यान गुंतागुंत काय आहेत?**

- संसर्ग, हेमॅटोमा तयार होणे आणि हर्निअल सॅकच्या सभोवतालच्या संरचनेला किंवा सामग्रीला दुखापत करणे योग्य तंत्राने टाळता येते. हर्निया झालेल्या जागेवर अवलंबून हर्नियाची पुनरावृत्ती सुमारे 3 ते 15% असते. पोस्टऑपरेटिव्ह कंबरदुखी सुमारे 53% रूग्णांमध्ये होऊ शकते परंतु 5 ते 15% रूग्णांमध्ये दीर्घकालीन वेदना होतात. चेतासंस्थेच्या वेदनांवर दाहक-विरोधी औषधे देऊन उपचार केले जातात.

शस्त्रक्रियेदरम्यान जाळी वापरताना कोणत्या अडचणी आहेत? संसर्ग होऊ शकतो. वरवरच्या संसर्गांना अँटिबायोटिक्सने हाताळले जाऊ शकते, परंतु खोलवरचे संक्रमण टाळण्यासाठी क्वचित प्रसंगी जाळी काढून टाकणे आवश्यक आहे. जाळीचे स्थलांतर किंवा त्याची झीज आणि जाळी चिकटून राहणे या समस्या निर्माण होऊ शकतात.

**पुनरावृत्तीची कारणे काय आहेत?**

- वर नमूद केलेल्या पूर्वसूचक घटकांवर उपचार न केल्यास, पोटाचे कमकुवत स्नायू, मागील शस्त्रक्रियेमध्ये संसर्ग आणि शस्त्रक्रियेनंतरच्या कालावधीत ताण येणे या गोष्टींमुळे पुनरावृत्ती होऊ शकते.

**हर्नियाच्या शस्त्रक्रियेतून बरे होण्यासाठी किती वेळ लागतो?**

- साधारणपणे, शस्त्रक्रियेनंतर 6 आठवडे ताण येतील अशा ॲक्टिव्हिटी टाळण्याचा सल्ला दिला जातो. जड वस्तू उचलणे आणि पोटात दाब वाढवणारे व्यायाम 6 महिने टाळावेत.

**कौशल्या मेडिकल फाउंडेशन आणि ट्रस्ट हॉस्पिटल: नितीन कंपनी जवळ, ठाणे (प)**
**संपर्क - 02245454000 / 8097555941**